**विनाअनुदानित संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी, एमबीए/एमएमएस, एमसीए, एम.ई./एम.टेक.,एम.फार्म.,पदव्युत्तर पदवी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या गुणवत्ता याद्या मंजूरीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबी**

| Name of Course | Cut off Date | Uploading Date |
|---|---|---|
| 1st year M.Pharmacy | 11.08.2009 | 18.08.2009 |
| 1st year MBA/MMS | 11.09.2009 | 18.09.2009 |
| 1st year MCA | 31.08.2009 | 05.09.2009 |
| 1st year B. E. | 17.09.2009 | 24.09.2009 |
| 1st year B. Pharmacy | 17.09.2009 | 29.09.2009 |
| 1st year B.HMCT | 14.09.2009 | 19.09.2009 |
| 1st year B.Arch. | 15.09.2009 | 20.09.2009 |
| Direct 2nd year Degg. Engg. | 24.09.2009 | 01.10.2009 |
| Direct 2nd year B. Pharmacy | 24.09.2009 | 01.10.2009 |

**तपासवायाची कागदपत्रे /बाबी**

०१) सन २००९-२०१० मध्ये संबंधित अभ्यासक्रम सुरु ठेवण्यास मान्यता दिल्याचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र.

०२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी **नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रम व प्रवेश क्षमता बदल** याबाबत मान्यता दिलेल्या पत्राची प्रत.

०३) **नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेश क्षमता बदल** याबाबतचा शासन निर्णय

०४) सन २००९-१०मध्ये नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रम / प्रवेश क्षमता बदल (६० पेक्षा जास्त) करण्यास परवानगी मिळाली असेल तर त्यासाठी संयुक्त खात्यात नियत ठेव जमा केल्याची पावती. तसेच हमीपत्र सादर केल्याची पोच सादर करणे.

०५) संस्था सुरु होऊन दुसरे शैक्षणिक वर्ष सुरु झालेले असेल, अशा संस्थांनी अध्यक्ष/सचिव व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात दुसरा हप्ता भरल्याची पावती.

**०६) संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेली गुणवत्ता यादीनुसार गुणवत्ता यादी तपासण्यासाठी वेबसाईटवरील गुणवत्ता यादीची प्रिंट काढून त्यानंतरच तपासणी करण्यात यावी.**

०७) ज्या विनाअनुदानित संस्थांना दि.१५ जून २००९ नंतर प्रवेश करण्याची परवानगी असेल, अशा संस्थांकडून मा.उच्च न्यायालयाचे आदेश/महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय/तंत्रशिक्षण संचालनालयाचे परवानगीचे पत्र आहे किंवा नाही, याची तपासणी करणे.

०८) प्रवेशित विद्यार्थ्यांना संबंधित अभ्यासक्रमाच्या कट ऑफ डेटच्या आतच प्रवेश दिलेला आहे किंवा नाही हे तपासणे.

**०९) केंद्र व राज्य सरकार करिता अर्थ व सांख्यिकी माहिती (संदर्भ दि.३०.९.२००९) भरण्याची ऑनलाईन अहवालाची प्रत**

१०) संस्था स्तरावरील जागांच्या प्रवेशाकरीता ज्या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीसाठी दिलेली असेल त्या जाहिरातीचे कात्रण व त्याअनुषंगाने तयार केलेली सर्वसाधारण गुणवत्ता यादी.

११) संबंधित अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केलेल्या शैक्षणिक शुल्काची प्रत.

**१२) अल्पसंख्यांक संस्थांच्या बाबतीत शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दिनांक ०४/०७/२००८ नुसार अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र तपासणे . अल्पसंख्यांक संस्थांनी अल्पसंख्यांक कोटयात इतर उमेदवारांना प्रवेश दिले असल्यास अशा संस्थांना अल्पसंख्यांक कोटयामध्ये पुरेशा प्रमाणात उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे ते प्रवेश गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातून करण्याबाबत अल्पसंख्यांक विकास विभागाने दिलेल्या परवानगी पत्र सादर करणे आवश्यक आहे. अल्पसंख्यांक विकास विभागाकडे परवानगी मागितल्याच्या पत्राची प्रत अथवा परवानगी घेणार आहोत अशा आशयाचे पत्र ग्राहय धरण्यात येऊ नये.**

१३) ज्या विनाअनुदानित संस्थांनी परदेशी विद्यार्थी, परदेशी नागरीक, परदेशी स्थित मूळ भारतीय नागरीक, आखाती देशांत काम करणाऱ्या भारतीय नागरीकांची मुले, एनआरआय उमेदवारांना प्रवेशक्षमतेच्या ओव्हर अँड ॲबोव्ह १५% पर्यंत प्रवेश दिला असल्यास, त्याबाबतचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे परवानगीचे पत्र व महाराष्ट्र शासनाचा संबंधित शासन निर्णय.

१४) ज्या विनाअनुदानित संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या सोबत जोडलेल्या अधिसूचनेनुसार फी वेव्हरचा १०% कोटा भरला असल्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या अटींचे पालन केलेले आहे किंवा नाही याची तपासणी करणे व प्रमाणित करणे

१५) ज्या विनाअनुदानित संस्थांनी मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्तीचे प्रवेश केले असतील अशा संस्थांना या संचालनालयात शासन निर्णय क्र.एनजीसी-२००५/(८२१/०५)/मशि-३, दि.२२/०१/२००७ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार दंड भरण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. सदर दंड भरल्यानंतरच सदर संस्थांच्या गुणवत्ता याद्यांना अंतिम मान्यता देण्यात यावी.

१६) ज्या विनाअनुदानित संस्थांनी संबंधित अभ्यासक्रमाच्या अंतिम दिनांक **(Cut-off Date)** नंतर प्रवेश / अपलोडिंग केले असेल अशा संस्थांची नांवे आणि अंतिम दिनांकानंतर प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या याबाबतची माहिती या संचालनालयास पाठविण्यात यावी. तसेच त्यांना शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांक .टीईएम-२००८/(५२/०८) तांशि-१, दि.२९/३/२००८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कट ऑफ डेटनंतर प्रवेश देण्यात आलेले उमेदवार X शिक्षण शुल्क प्रमाणे दंड लागू आहे हे कळविण्यात यावे.

१७) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी संस्थांकडून संचालनालयास कळविलेल्या रिक्त जागा आणि प्रत्यक्षात भरलेल्या जागा याची काळजीपूर्वक पडताळणी करावी व त्या संख्येमध्ये तफावत आढळून आल्यास त्यासंबंधी नियमानुसार कार्यवाही करावी.

१८) शासनाच्या निर्णयानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी न घेण्याचे निर्देश संस्थांनी पाळले अथवा नाही याची खात्री करणे. फी घेतली असल्यास ती तात्काळ परत करण्याचे संस्थांना निर्देश देणे व तसा अहवाल संचालनालयास सादर करणे.

## प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी.

०१) या संचालनालयामार्फत प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २००९-१०मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीत नमूद केलेली खालीलप्रमाणे प्रवेश पात्रता विद्यार्थी पूर्ण करतो की नाही, हे तपासणे.

| |
|---|
| Candidate should be an Indian National and should have passed the HSC (Std.XII) examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or its equivalent examination with subjects English, Physics, Chemistry and Mathematics **and** secured minimum 50% marks i.e. 150 marks out of 300 marks (minimum 45% marks i.e. 135 marks out of 300 marks in case of candidates of Backward class categories belonging to Maharashtra state only) in the subjects Physics, Chemistry and Mathematics added together. |

०२) Annexure-I मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-II मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

०३) एसएससी व एचएससी परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

०४) शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.

०५) मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे मूळ प्रमाणपत्र / जात वैधतेचे मूळ प्रमाणपत्र.

०६) GoI Nominee कोटयामध्ये प्रवेश घेतलेल्या उमेदवारास प्रवेश देण्याबाबतचे या संचालनालयाचे पत्र.

०७) एससी/एसटी व्यतिरिक्त इतर सर्व मागासवर्गीयांसाठी आवश्यक असलेले दि.३१ मार्च २०१० पर्यंत वैध असलेले **Non-Creamy Layer Certificate**

०८) शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास **Affidavit** सादर करणे

०९) सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET किंवा AIEEE २००९ चे मूळ स्कोअर कार्ड.

१०) महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र तपासणे.

## प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी.

१. या संचालनालयामार्फत प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २००९-१०मधील प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीत नमूद केलेली खालीलप्रमाणे प्रवेश पात्रता विद्यार्थी पूर्ण करतो की नाही, हे तपासणे.

| |
|---|
| Candidate should be an Indian National and should have passed the HSC (Std.XII) examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or its equivalent examination with subjects English, Physics, Chemistry and Biology/Mathematics and secured minimum 50% marks i.e 150 marks out of 300 marks(45% marks i.e 135 marks out of 300 marks for backward class category candidates belonging to Maharashtra state only) in the subjects Physics, Chemistry and Biology/Mathematics added together (Maximum of Marks Obtained in Biology/Mathematics shall be considered for the purpose of addition). |

२. Annexure-I मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-II मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. एसएससी व एचएससी परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

४. शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.

५. मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे मूळ प्रमाणपत्र / जात वैधतेचे मूळ प्रमाणपत्र.

६. GoI Nominee कोटयामध्ये प्रवेश घेतलेल्या उमेदवारास प्रवेश देण्याबाबतचे या संचालनालयाचे पत्र.

७. एससी/एसटी व्यतिरिक्त इतर सर्व मागासवर्गीयांसाठी आवश्यक असलेले दि.३१ मार्च २०१० पर्यंत वैध असलेले **Non-Creamy Layer Certificate**

८. शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास **Affidavit** सादर करणे

९. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET - २००९ चे मूळ स्कोअर कार्ड.

१०. महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र तपासणे.

## प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी.

१. या संचालनालयामार्फत प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २००९-१०मधील प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीत नमूद केलेली खालीलप्रमाणे प्रवेश पात्रता विद्यार्थी पूर्ण करतो की नाही, हे तपासणे.

Candidate should be an Indian National and should have passed the HSC (10+2 level) examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or its equivalent examination with subject Mathematics and secured minimum 50% marks in aggregate (45% marks in aggregate for backward class category candidates belonging to Maharashtra state only).

२. Annexure-II मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-III मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. एसएससी व एचएससी परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

४. शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.

५. मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे मूळ प्रमाणपत्र व जात वैधतेचे मूळ प्रमाणपत्र

६. GoI Nominee कोटयामध्ये प्रवेश घेतलेल्या उमेदवारास प्रवेश देण्याबाबतचे या संचालनालयाचे पत्र.

७. एससी/एसटी व्यतिरिक्त इतर सर्व मागासवर्गीयांसाठी आवश्यक असलेले दि.३१ मार्च २०१०पर्यंत वैध असलेले **Non-Creamy Layer Certificate**

८. शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास **Affidavit** सादर करणे

९. शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये ***सहभागी असलेल्या संस्थांमध्ये*** प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे शासन CET -२००९ चे मूळ स्कोअर कार्ड तपासणे. तसेच सदर **परीक्षा कमीत कमी ४०% गुणांनी उत्तीर्ण केलेली आहे किंवा नाही** हे तपासणे.

१०. शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये ***सहभागी नसलेल्या संस्थांमध्ये*** प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी **National Aptitude Test in Architecture (NATA) ही परीक्षा २०० पैकी किमान ८० गुणांनी उत्तीर्ण केलेली आहे किंवा नाही** हे तपासणे.

११. महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र तपासणे.

**प्रथम वर्ष हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी.**

१. या संचालनालयामार्फत प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २००९-१०मधील प्रथम वर्ष हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीत नमूद केलेली खालीलप्रमाणे प्रवेश पात्रता विद्यार्थी पूर्ण करतो की नाही, हे तपासणे.

| |
|---|
| Candidate should be an Indian National and should have passed the HSC (Std.XII) examination of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education or its equivalent examination in Science/Home Science/Commerce/Arts/MCVC with **English** as **one of the subject** and secured minimum 50% marks in aggregate (45% marks in aggregate for backward class category candidates belonging to Maharashtra state only) |

२. Annexure-II मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-III मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. एसएससी व एचएससी परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

४. शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.

५. मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे मूळ प्रमाणपत्र

६. एससी/एसटी व्यतिरिक्त इतर सर्व मागासवर्गीयांसाठी आवश्यक असलेले दि.३१ मार्च २०१० पर्यंत वैध असलेले **Non-Creamy Layer Certificate**

७. शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास **Affidavit** सादर करणे.

८. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET - २००९ चे मूळ स्कोअर कार्ड.

९. महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र तपासणे.

**प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी.**

१. या संचालनालयामार्फत प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २००९-१०मधील प्रथम वर्ष एमबीए / एमएमएस पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीत नमूद केलेली खालीलप्रमाणे प्रवेश पात्रता विद्यार्थी पूर्ण करतो की नाही, हे तपासणे.

| |
|---|
| Candidate should be an Indian National and should have passed with minimum 45% marks in aggregate (40% marks in aggregate for backward class category candidates belonging to Maharashtra state only) in any Bachelor's degree of minimum three year duration in any discipline recognised by the Association of Indian Universities **OR** any Bachelor's degree of minimum three year duration in any discipline recognised by the Association of Indian Universities **AND** passed in any Post Graduate degree course of minimum two year duration recognised by the Association of Indian Universities in any discipline with minimum 45% marks in aggregate (40% marks in aggregate for backward class category candidates belonging to Maharashtra state only) |

२. Annexure-II मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-III मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. एसएससी / एचएससी / पदवी परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

४. शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.

५. मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे मूळ प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. तसेच ज्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांकडून दिनांक ३०.११.२००९ पर्यंत सादर करण्याबाबतचे हमीपत्र

६. एससी/एसटी व्यतिरिक्त इतर सर्व मागासवर्गीयांसाठी आवश्यक असलेले दि.३१ मार्च २०१० पर्यंत वैध असलेले **Non-Creamy Layer Certificate**

७. शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास **Affidavit** सादर करणे

८. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET - २००९ चे मूळ स्कोअर कार्ड तसेच जर उमेदवाराने All India CET (CAT/JMET/ATMA/XAT/MAT (conducted in February 2009) उमेदवाराने दिलेली असल्यास फेब्रुवारी २००९ मधील स्कोअर कार्ड आवश्यक आहे.

९. महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र तपासणे.

## प्रथम वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी.

१. या संचालनालयामार्फत प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २००९-१०मधील प्रथम वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीत नमूद केलेली प्रवेश पात्रता विद्यार्थी पूर्ण करतो की नाही हे तपासणे.

Candidate should be an Indian National and should have passed with minimum 45% marks in aggregate (45% marks in aggregate for backward class category candidates belonging to Maharashtra state only) in any Bachelor's degree of minimum three year duration in any discipline recognised by the **Association of Indian Universities and having studied Mathematics or Statics as one of the subject at 10+2 level or higher level examination. (The candidates who have passed BCA,BCS,B.Sc.(COM./IT)with minimum 45% of marks are not required to fulfil the requirement of having studied Mathematics or Statics as one of the subject at 10+2 level or higher level examination.)**

२. Annexure-II मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलेली आहेत किंवा नाही हे तपासणे. तसेच Annexure-III मध्ये नमूद केलेल्या Guidelines नुसार संस्थेने संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली की नाही, हे तपासणे

३. एसएससी / एचएससी / पदवी परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

४. शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.

५. मागासवर्गीयांच्या बाबतीत जातीचे मूळ प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. तसेच ज्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा उमेदवारांकडून दिनांक ३०.११.२००९ पर्यंत सादर करण्याबाबतचे हमीपत्र

६. एससी/एसटी व्यतिरिक्त इतर सर्व मागासवर्गीयांसाठी आवश्यक असलेले दि.३१ मार्च २०१० पर्यंत वैध असलेले **Non-Creamy Layer Certificate**

७. शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास **Affidavit** सादर करणे

८. सदर अभ्यासक्रमाच्या शासन CET - २००९ चे मूळ स्कोअर कार्ड.

९. महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेले संबंधित विद्यापीठाचे पात्रता प्रमाणपत्र तपासणे.

## **थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी.**

०१) या संचालनालयामार्फत प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २००९-१०मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीतील प्रवेश पात्रतेनुसार विद्यार्थ्याची प्रवेश पात्रता तपासणे.

०२) थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणारा विद्यार्थी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या संस्थेतून कमीत कमी तीन वर्षे कालावधीचा अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. म्हणजेच त्याच्या पदविका अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेत किंवा उत्तीर्ण प्रमाणपत्रामध्ये **“ ६० टक्के गुणांनी उत्तीर्ण ”** असा उल्लेख असणे आवश्यक आहे.

०३) एसएससी / एचएससी / पदविका परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

०४) शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.

०५) विद्यार्थ्याने पदविका अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्याबाहेरील संस्थेत पूर्ण केला असेल तर तो अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील पदविका अभ्यासक्रमाशी समकक्ष असल्याचे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील पदविका समकक्षता प्रमाणपत्र

०६) शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास **Affidavit** सादर करणे

०७) थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशाच्या बाबतीत संस्थांनी संचालनालयास सादर केलेल्या रिक्त जागांची माहितीची प्रत आणि प्रत्यक्षात संस्थांनी दिलेल्या प्रवेशाची संख्या यांचा ताळमेळ घालून त्यानुसारच प्रवेश झालेले आहेत याची काटेकोर पडताळणी करण्यात यावी.

## **थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी.**

१. या संचालनालयामार्फत प्रसिध्द केलेल्या शैक्षणिक वर्ष २००९-१०मधील थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमावलीतील प्रवेश पात्रतेनुसार विद्यार्थ्याची प्रवेश पात्रता तपासणे.
२. थेट द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेणारा विद्यार्थी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या संस्थेतून कमीत कमी दोन वर्षे कालावधीचा औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. म्हणजेच त्याच्या पदविका अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेत किंवा उत्तीर्ण प्रमाणपत्रामध्ये **“प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण ”** असा उल्लेख असणे आवश्यक आहे.
३. एसएससी / एचएससी / पदविका परीक्षेची मूळ गुणपत्रिका.
४. शाळा / महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला.
५. विद्यार्थ्याने पदविका अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्याबाहेरील संस्थेत पूर्ण केला असेल तर तो अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्यातील पदविका अभ्यासक्रमाशी समकक्ष असल्याचे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील पदविका समकक्षता प्रमाणपत्र
६. शाळा / महाविद्यालय सोडल्याची दुय्यम प्रत सादर केलेली असल्यास **Affidavit** सादर करणे
७. थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशाच्या बाबतीत संस्थांनी संचालनालयास सादर केलेल्या रिक्त जागांची माहितीची प्रत आणि प्रत्यक्षात संस्थांनी दिलेल्या प्रवेशाची संख्या यांचा ताळमेळ घालून त्यानुसारच प्रवेश झालेले आहेत याची काटेकोर पडताळणी करण्यात यावी.